ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

नाशिक– ४२२ २२२

## मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा

## एम.ए. मराठी (M41), हिंदी (M42), इंग्रजी (M43)

## शिक्षणक्रम माहितीपुस्तिका

**शैक्षणिक वर्ष : 2015–2016**

# एम.ए. मराठी (M41), हिंदी (M42), इंग्रजी (M43)
# शिक्षणक्रम माहितीपुस्तिका

## अनुक्रमणिका


शैक्षणिक वेळापत्रक ..... ४

१. विद्याशाखेचा परिचय ..... ७

२. शिक्षणक्रमाविषयी ..... ७

३. नोंदणी प्रक्रिया ..... ९

४. विभागीय केंद्रे ..... ११

५. विशेष सूचना/संपर्कासाठी ..... ११

परिशिष्टे ..... १३

Appendix 1 : Online Admission Process flow for Candidate not having 16 Digit P.R.N.
Online Admission Process flow for Candidate who already having 16 Digit P.R.N.

Appendix 2: उमेदवार/विद्यार्थी करारनामा
Candidate/Student Agreement at the time of Admission

Appendix 3: गरीब विद्यार्थी सहाय्य योजना नियमावली

Appendix 4: University Grants Commission Resolution (2004)

Appendix 5: G.R. of Equivalency for 10th and 12th

Appendix 6: एकापेक्षा अधिक शिक्षणक्रमांना प्रवेश

Appendix 7: G.R. of Equivalency

Appendix 8: Letter of Recognition from UGC

Appendix 9: विद्यार्थी सहायता आणि विद्यार्थी कल्याण योजना

## विद्यापीठ गीत



एक प्रतिज्ञा असे आमुची ज्ञानाची साधना ।
चिरंतन ज्ञानाची साधना ।
ज्ञान हेच संजीवन साऱ्या जगताच्या जीवना ।। धृ ।।

ज्योत जागवू सुजाणतेची सकलांच्या अंतरी ।
तीच निवारील पटल तमाचे प्रभात सूर्यापरी ।
ज्ञानच देउळ, ज्ञानच दैवत, प्रगतीच्या पूजना ।। १।।

नव्या युगाचा नव्या जगाचा ज्ञान धर्म आहे ।
त्यातच अमुच्या उजळ उद्याचे आश्वासन राहे ।
मुक्त करिल तो परंपरेच्या बंदिघरातुन मना ।। २ ।।

हाच मंत्र नेईल आम्हाला दिव्य भविष्याकडे ।
न्यायनीतीचे पाऊल जेथे भेदाशी ना अडे ।
जे जे मंगल पावन त्याची जेथे आराधना ।। ३ ।।

*कुसुमाग्रज*


**निर्मिती**

श्री. आनंद यादव
व्यवस्थापक, ग्रंथनिर्मिती केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२



© २०१५, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक



- **प्रथम प्रकाशन** : जून २०१५
- **अक्षरजुळणी** : ॲकोसिस, नाशिक – १०
- **प्रकाशक** : डॉ. प्रकाश अतकरे, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

NB-15-16-24 (MA_MAR_HIN_ENG)

# एम.ए. मराठी (M41), हिंदी (M42), इंग्रजी (M43) शिक्षणक्रम माहितीपुस्तिका

## शैक्षणिक वेळापत्रक २०१५-१६

**(अ) प्रवेश परीक्षेची आवश्यकता नसलेले वार्षिक परीक्षा पद्धत शिक्षणक्रम**

| क्रमांक | प्रक्रिया | दिनांक |
|---|---|---|
| 1 | ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची सुरुवात | 01-06-2015 |
| 2 | विलंब शुल्काविना शुल्क जमा करण्याची अंतिम तारीख | 30-06-2015 |
| 3 | विलंब शुल्क (रु. 100/-) सह शुल्क जमा करण्याची अंतिम तारीख | 31-07-2015 |
| 4 | अति विलंब शुल्क (रु. 500/-) सह शुल्क जमा करण्याची अंतिम तारीख | 25-08-2015 |
| 5 | अभ्यासकेंद्रावर प्रवेश यादी प्रकाशित करण्याची तारीख | 31-08-2015 |
| 6 | अध्ययन साहित्य वितरण समाप्तीची अंतिम तारीख | 31-08-2015 |
| 7 | संपर्कसत्रांची सुरुवात | 01-09-2015 |
| 8 | पुनर्परीक्षार्थींसाठी परीक्षा अर्ज सादर करण्याची सुरुवात (नोव्हेंबर परीक्षा) | 01-09-2015 |
| 9 | प्रारूप आराखडा मंजुरीसाठी सादर करण्याची सुरुवात (नोव्हेंबर परीक्षा) | 01-08-2015 |
| 10 | अंतर्गत मूल्यमापन परीक्षा | 12-09-2015 |
| 11 | अंतर्गत मूल्यमापन परीक्षा | 12-10-2015 |
| 12 | पुनर्परीक्षार्थींसाठी परीक्षा अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख (नोव्हेंबर परीक्षा) | 15-09-2015 |
| 13 | प्रारुप आराखडा मंजुरीसाठी विद्यापीठास सादर करण्याची (नोव्हेंबर परीक्षा) अंतिम तारीख | 15-09-2015 |
| 14 | अंतर्गत मूल्यमापन परीक्षा | 12-11-2015 |
| 15 | अंतिम परीक्षा सुरुवात (पुनर्परीक्षार्थी परीक्षा लागू असल्यास) | 15-11-2015 |
| 16 | अंतिम परीक्षा समाप्ती (पुनर्परीक्षार्थी परीक्षा लागू असल्यास) | 15-12-2015 |
| 17 | अंतर्गत मूल्यमापन परीक्षा | 12-01-2016 |
| 18 | प्रारुप आराखडा मंजुरीसाठी सादर करण्याची सुरुवात (मे परीक्षा) | 30-01-2016 |
| 19 | पुनर्परीक्षार्थींसाठी परीक्षा अर्ज सादर करण्याची सुरुवात (मे परीक्षा) | 30-01-2016 |
| 20 | अंतर्गत मूल्यमापन परीक्षा | 12-02-2016 |
| 21 | अंतर्गत मूल्यमापन परीक्षा | 12-03-2016 |
| 22 | प्रारुप आराखडा मंजुरीसाठी विद्यापीठास सादर करण्याची (मे परीक्षा) अंतिम तारीख | 15-03-2016 |
| 23 | पुनर्परीक्षार्थींसाठी परीक्षा अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख (मे परीक्षा) | 15-03-2016 |
| 24 | अंतर्गत मूल्यमापन परीक्षा | 12-04-2016 |
| 25 | संपर्कसत्रांची समाप्तीची तारीख | 15-04-2016 |
| 26 | अंतर्गत मूल्यमापनाचे गुण विद्यापीठाकडे सादर करण्याची अंतिम तारीख | 16-04-2016 |
| 27 | अंतर्गत गुणदान यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्धीची तारीख | 18-04-2016 |
| 28 | अंतिम परीक्षा सुरुवात | 05-05-2016 |
| 29 | अंतिम परीक्षा समाप्ती | 20-06-2016 |

## (आ) प्रवेश परीक्षेची आवश्यकता असलेले / सत्र पद्धत शिक्षणक्रम

| क्रमांक | प्रक्रिया | दिनांक |
|---|---|---|
| 1 | ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची सुरुवात | 01-06-2015 |
| 2 | प्रवेश परीक्षेचा दिनांक | 01-07-2015 |
| 3 | प्रथम तुकडी प्रवेश यादी प्रसिद्धीचा दिनांक | 08-07-2015 |
| 4 | प्रथम तुकडी विद्यार्थी शुल्क भरण्याची प्रथम तारीख | 08-07-2015 |
| 5 | प्रथम तुकडी विद्यार्थ्यांसाठी शुल्क भरण्याची अंतिम तारीख | 15-07-2015 |
| 6 | द्वितीय यादी प्रसिद्धीची तारीख | 16-07-2015 |
| 7 | द्वितीय यादी प्रवेश सुरू (विलंब शुल्क रु. 100/- सह) | 16-07-2015 |
| 8 | द्वितीय यादी प्रवेश समाप्त | 23-07-2015 |
| 9 | जागेवर प्रवेश (अतिविलंब शुल्क रु. 500/- सह) सुरू | 24-07-2015 |
| 10 | जागेवर प्रवेश (अतिविलंब शुल्कासह) समाप्त | 25-07-2015 |
| 11 | विद्यापीठाकडून प्रवेश निश्चिती जाहीर करण्याची अंतिम तारीख | 30-07-2015 |
| 12 | अभ्यासकेंद्रावर प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी प्रसिद्ध करण्याची तारीख | 30-07-2015 |
| 13 | अध्ययन साहित्य वितरण प्रक्रियेची समाप्ती | 31-07-2015 |
| 14 | संपर्कसत्रांची सुरुवात (विषम सत्र) | 01-08-2015 |
| 15 | पुनर्परीक्षार्थींसाठी परीक्षा अर्ज सादर करण्याची सुरुवात (नोव्हेंबर परीक्षा) | 01-08-2015 |
| 16 | मुदतीमध्ये सादर केलेल्या प्रारुप आराखडा मंजुरीची तारीख (नोव्हेंबर परीक्षा) | 01-08-2015 |
| 17 | अंतर्गत मूल्यमापन परीक्षा | 12-09-2015 |
| 18 | अंतर्गत मूल्यमापन परीक्षा | 12-10-2015 |
| 19 | पुनर्परीक्षार्थींसाठी परीक्षा अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख (नोव्हेंबर परीक्षा) | 15-09-2015 |
| 20 | प्रारुप आराखडा मंजुरीसाठी विद्यापीठास सादर करण्याची (नोव्हेंबर परीक्षा) अंतिम तारीख | 15-09-2015 |
| 21 | संपर्कसत्रांची समाप्तीची तारीख (विषम सत्र) | 13-11-2015 |
| 22 | अंतर्गत मूल्यमापनाचे गुण विद्यापीठाकडे सादर करण्याची अंतिम तारीख | 15-11-2015 |
| 23 | अंतर्गत गुणदान यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्धीची तारीख | 15-11-2015 |
| 24 | अंतिम परीक्षा सुरुवात (विषम सत्र) | 15-11-2015 |
| 25 | अंतिम परीक्षा समाप्ती (विषम सत्र) | 15-12-2015 |
| 26 | संपर्कसत्रांची सुरुवात (सम सत्र) | 02-01-2016 |
| 27 | अंतर्गत मूल्यमापन परीक्षा | 12-01-2016 |
| 28 | प्रारुप आराखडा मंजुरीसाठी सादर करण्याची सुरुवात (मे परीक्षा) | 30-01-2016 |
| 29 | पुनर्परीक्षार्थींसाठी परीक्षा अर्ज सादर करण्याची सुरुवात (मे परीक्षा) | 30-01-2016 |
| 30 | अंतर्गत मूल्यमापन परीक्षा | 12-02-2016 |
| 31 | अंतर्गत मूल्यमापन परीक्षा | 12-03-2016 |
| 32 | प्रारुप आराखडा मंजुरीसाठी विद्यापीठास सादर करण्याची (मे परीक्षा) अंतिम तारीख | 15-03-2016 |
| 33 | पुनर्परीक्षार्थींसाठी परीक्षा अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख (मे परीक्षा) | 15-03-2016 |
| 34 | अंतर्गत मूल्यमापन परीक्षा | 12-04-2016 |
| 35 | संपर्कसत्रांची समाप्तीची तारीख (सम सत्र) | 15-04-2016 |
| 36 | अंतर्गत मूल्यमापनाचे गुण विद्यापीठाकडे सादर करण्याची अंतिम तारीख | 16-04-2016 |
| 37 | अंतर्गत गुणदान यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्धीची तारीख | 18-04-2016 |
| 38 | अंतिम परीक्षा सुरुवात (सम सत्र) | 05-05-2016 |
| 39 | अंतिम परीक्षा समाप्ती (सम सत्र) | 20-06-2016 |

### (इ) प्रवेश परीक्षेची आवश्यकता नसलेले / सत्र पद्धत / दोन सत्रांत प्रवेश असणारे (प्रमाणपत्र) शिक्षणक्रम

| क्रमांक | प्रक्रिया | दिनांक |
|---|---|---|
| 1 | ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची सुरुवात | 01-06-2015 |
| 2 | विलंब शुल्काविना शुल्क भरण्याची अंतिम तारीख | 15-07-2015 |
| 3 | विलंब शुल्क रु. 100/- सह प्रवेशाची सुरुवात | 16-07-2015 |
| 4 | विलंब शुल्क रु. 100/- सह प्रवेशाची अंतिम तारीख | 23-07-2015 |
| 5 | अतिविलंब शुल्क रु. 500/- सह प्रवेशाची सुरुवात | 24-07-2015 |
| 6 | अतिविलंब शुल्क रु. 500/- सह प्रवेशाची अंतिम तारीख | 25-07-2015 |
| 7 | विद्यापीठाकडून प्रवेश निश्चिती जाहीर करण्याची अंतिम तारीख | 30-07-2015 |
| 8 | अभ्यासकेंद्रावर प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी प्रसिद्ध करण्याची तारीख | 30-07-2015 |
| 9 | अध्ययन साहित्य वितरण प्रक्रियेची समाप्ती | 31-07-2015 |
| 10 | संपर्कसत्रांची सुरुवात (विषम सत्र) | 01-08-2015 |
| 11 | पुनर्परीक्षार्थींसाठी परीक्षा अर्ज सादर करण्याची सुरुवात (नोव्हेंबर परीक्षा) | 01-08-2015 |
| 12 | मुदतीमध्ये सादर केलेल्या प्रारुप आराखडा मंजुरीची तारीख (नोव्हेंबर परीक्षा) | 01-08-2015 |
| 13 | अंतर्गत मूल्यमापन परीक्षा | 12-09-2015 |
| 14 | अंतर्गत मूल्यमापन परीक्षा | 12-10-2015 |
| 15 | पुनर्परीक्षार्थींसाठी परीक्षा अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख (नोव्हेंबर परीक्षा) | 15-09-2015 |
| 16 | प्रारुप आराखडा मंजुरीसाठी विद्यापीठास सादर करण्याची (नोव्हेंबर परीक्षा) अंतिम तारीख | 15-09-2015 |
| 17 | संपर्कसत्रांची समाप्तीची तारीख (विषम सत्र) | 13-11-2015 |
| 18 | अंतर्गत मूल्यमापनाचे गुण विद्यापीठाकडे सादर करण्याची अंतिम तारीख | 15-11-2015 |
| 19 | अंतर्गत गुणदान यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्धीची तारीख | 15-11-2015 |
| 20 | अंतिम परीक्षा सुरुवात (विषम सत्र) | 15-11-2015 |
| 21 | अंतिम परीक्षा समाप्ती (विषम सत्र) | 15-12-2015 |
| 22 | दुसरी तुकडी (जानेवारी - मे) साठी प्रवेश सुरू | 01-11-2015 |
| 23 | विलंब शुल्काविना शुल्क भरण्याची अंतिम तारीख (दुसरी तुकडी) | 01-12-2015 |
| 24 | विलंब शुल्कासह (रु. 100/-) शुल्क भरण्याची अंतिम तारीख (दुसरी तुकडी) | 10-12-2015 |
| 25 | अतिविलंब शुल्कासह (रु. 500/-) शुल्क भरण्याची अंतिम तारीख (दुसरी तुकडी) | 20-12-2015 |
| 26 | संपर्कसत्रांची सुरुवात (सम सत्र) | 02-01-2016 |
| 27 | अंतर्गत मूल्यमापन परीक्षा | 12-01-2016 |
| 28 | प्रारुप आराखडा मंजुरीसाठी सादर करण्याची सुरुवात (मे परीक्षा) | 30-01-2016 |
| 29 | पुनर्परीक्षार्थींसाठी परीक्षा अर्ज सादर करण्याची सुरुवात (मे परीक्षा) | 30-01-2016 |
| 30 | अंतर्गत मूल्यमापन परीक्षा | 12-02-2016 |
| 31 | अंतर्गत मूल्यमापन परीक्षा | 12-03-2016 |
| 32 | प्रारुप आराखडा मंजुरीसाठी विद्यापीठास सादर करण्याची (मे परीक्षा) अंतिम तारीख | 15-03-2016 |
| 33 | पुनर्परीक्षार्थींसाठी परीक्षा अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख (मे परीक्षा) | 15-03-2016 |
| 34 | अंतर्गत मूल्यमापन परीक्षा | 12-04-2016 |
| 35 | संपर्कसत्रांची समाप्तीची तारीख (सम सत्र) | 15-04-2016 |
| 36 | अंतर्गत मूल्यमापनाचे गुण विद्यापीठाकडे सादर करण्याची अंतिम तारीख | 16-04-2016 |
| 37 | अंतर्गत गुणदान यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्धीची तारीख | 18-04-2016 |
| 38 | अंतिम परीक्षा सुरुवात (सम सत्र) | 05-05-2016 |
| 39 | अंतिम परीक्षा समाप्ती (सम सत्र) | 20-06-2016 |

## १. विद्याशाखेचा परिचय

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे या विद्याशाखेत मानवनिर्मित कला, साहित्य या सर्जनशील निर्मितिव्यापाराचा आणि कुटुंबसंस्थेपासून राज्यसंस्थेपर्यंतच्या विविध संस्थांच्या रचनांचा, तत्त्वज्ञानाचा व इतिहास–परंपरांचा अभ्यास केला जातो. २१ व्या शतकातील जागतिक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी बौद्धिक पूर्वतयारी करणे आणि अध्ययनशील समाजासाठी शैक्षणिक संसाधनांचा विकास करणे हे या विद्याशाखेचे ध्येय आहे. विद्याशाखेतील विविध शिक्षणक्रमांचा आशय हा मानवकेंद्री असतो. मानवी मूल्यांवर व माणसाच्या विकास–कार्यक्रमांवर भर देणारा आशय हे या विद्याशाखेतील अभ्यासक्रमांचे वैशिष्ट्य आहे.

विद्याशाखेची ठळक वैशिष्ट्ये थोडक्यात अशी :

१. जगभरातल्या विविध संस्कृतींचा, राष्ट्र–राज्यांच्या जडणघडणीचा, इतिहास परंपरांचा, बी.ए., एम.ए., एम. फिल. व पीएच.डी. शिक्षणक्रमांचा अभ्यासक्रमात समावेश.

२. मानवी हक्क, स्वातंत्र्य, समता, बंधुता, इत्यादी मूल्ये, ग्राहकसंरक्षण, पर्यावरण रक्षणादी चळवळी, सार्क, युनो, इत्यादी जागतिक कल्याणकारी संघटनांचे कार्य, स्त्रियांचे सबलीकरण, वंचितांच्या अस्मितेचे लढे, भाषा, धर्म, प्रदेशांच्या विविधतेतून एकतेसाठी रचलेले नमुना–दर्श, जागतिकीकरण आणि स्थानिक विकासाची सांगड अशा विविध आशयसूत्रांचा अभ्यासक्रमांमध्ये समावेश आहे.

३. ग्रंथालय व माहितीशास्त्र, वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन, गांधीविचारदर्शन, मानवी हक्क, ग्राहक संरक्षण अशा विशेष विषयांवर स्वतंत्र शिक्षणक्रम.

४. सिद्धांत आणि व्यवहार यांची सांगड घालणारे उपयोजित अभ्यासक्रम.

५. व्यक्तीच्या सर्जनशीलतेला व कल्पकतेला वाव देणारे अपारंपरिक अभ्यासक्रम.

६. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी आणि व्यावसायिक यशासाठी लागणाऱ्या पूरक कौशल्यांना वाव देणारे अभ्यासक्रम.

७. स्वयंअध्ययनासाठी लागणाऱ्या नावीन्यपूर्ण कौशल्यांचे शिक्षण.

८. पायाभूत अभ्यासक्रमात विविध संकल्पनांचे स्पष्टीकरण देण्यावर भर.

९. स्वयंअध्ययन पुस्तके, स्वाध्याय, क्षेत्रीय कार्य, प्रकल्प अभ्यास, उपग्रह सेवा व वेबमाध्यमांतून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन सेवा अशा विविध अंगांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहाय्य.

१०. प्रत्येक शिक्षणक्रमात आवडीप्रमाणे निवड करता येतील असे पर्याय.

## २. शिक्षणक्रमाविषयी

आपल्या विद्यापीठाच्या पदवीधारक विद्यार्थ्यांकडून आणि समाजातील इतर वर्गांकडून पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम सुरू करण्यासाठी सातत्याने मागणी होत होती. त्याचा विचार करून शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील दूरशिक्षण केंद्राने विकसित केलेला मराठी, हिंदी व इंग्रजी या विषयातील एम. ए. शिक्षणक्रम सुरू करण्यात आलेला आहे.

### २.१ शिक्षणक्रमाची संरचना

**एम. ए. भाग–१ व २ चे विषय**

एम. ए. साठी पुढीलप्रमाणे पेपर्स असतील. काही पेपर्स आवश्यक व काही पेपर्स ऐच्छिक आहेत. त्याची माहिती प्रत्येक पेपरसमोर दिलेली आहे. एम. ए. सत्र–१ साठी ४ पेपर्स व एम. ए. सत्र–२ साठी ४ पेपर्स आहेत. तसेच एम. ए. सत्र–३ साठी ४ पेपर्स व एम. ए. सत्र–४ साठी ४ पेपर्स आहेत.

❖ **M.A. Part-I Marathi : Sem.-I**
**(From Academic Year 2015-16 onwards)**

| *No.* | *Name of Paper* | *Compulsory / Optional* |
|---|---|---|
| | **Group -I (Min. 2 Max. 2)** | |
| 1. | Sahityavichar Va Samikshya | Compulsory |
| 2. | Marahti Vangmayacha Itihas (A.D. 1800 to 1980) (Prarambh Te Kadambari) | Compulsory |
| | **Group-II (Min.1 Max.1)** | |
| 3. | Eka Lekhakacha Abhyas - Madhyayugin : Tukaram (Kavya) | Optional |
| | OR | |
| | Eka Lekhakacha Abhyas - Arvachin - Bhalchandra Nemade (Samkal Te Bidhar) | Optional |
| | **Group-III (Min.1 Max.1)** | |
| 4. | Marathi Bhasha : Sampreshan Ani Sargen | Optional |
| | Marathi Vangmayain Chalvalicha Abhyas (Navsahitya Te Gramin) | Optional |
| | Loksahitya Ani Marathi Loksahitya (Sankalpana Va Parampara) | Optional |
| | Sahityachi Sanskrutik Parshvabhumi | Optional |

## ✣ M.A. Part-I Marathi : Sem. - II
## (From Academic Year 2015-16 onwards)

| No. | Name of Paper | Compulsory / Optional |
|---|---|---|
| 1. | **Group -I (Min. 2 Max. 2)**<br>Samikshya Va Sundaryashistra | Compulsory |
| 2. | Marathi Vangmayacha Itihas (A.D. 1800 to 1980) (Natyavangmaya Te Lalitetar) | Compulsory |
| 3. | **Group-II (Min.1 Max.1)**<br>Eka Lekhakacha Abhyas - Madhyayugin Tukaram (Tatvadnyan)<br>OR<br>Eka Lekhakacha Abhyas - Madhyayugin Arvachin - Bhalchandra Nemade (Jarila Te Samikshya) | Optional<br><br><br>Optional |
| 4. | **Group-III (Min.1 Max.1)**<br>Marathi Bhasha : Lekhan Ani Upyojan | Optional |
| | Marathi Vangmayain Chalvalicha Abhyas (Strivadi Te Adiwasi) | Optional |
| | Loksahitya Ani Marathi Loksahitya (Parampara Va Sanshodhan) | Optional |
| | Sahityachi Samajik Drishtine Abhyas | Optional |

## ✣ M.A. Part-I Hindi : Sem-I
## (From Academic Year 2015-16 onwards)

| No. | Name of Paper | Compulsory / Optional |
|---|---|---|
| 1. | **Group -I (Min. 3 Max. 3)**<br>Adhunik Gadhya Sahitya-I | Compulsory |
| 2. | Bhasha Vidnyan Aevm Hindi Bhasha-I | Compulsory |
| 3. | Prayojanmulak Hindi-I | Compulsory |
| 4. | **Group-II (Min.1 Max.1)**<br>(ka)Vayvasaik Varg - Patrakarita Prashikshan-I | Optional |
| | (ka) Vyavsaik Varg - Bhasha Prodoyogiki-I | Optional |
| | (ka) Sahitya Varg - Vishesh Rachanakar : Mohandas Nemeshray-I | Optional |
| | (Kha) Sahitya Varg - Prachin Evam Nirgun Bhakti Kavya-I | Optional |

## ✣ M.A. Part-I Hindi : Sem-II
## (From Academic Year 2015-16 onwards)

| No. | Name of Paper | Compulsory / Optional |
|---|---|---|
| 1. | **Group -I (Min. 3 Max. 3)**<br>Adhunik Gadhya Sahitya-I | Compulsory |
| 2. | Bhasha Vidnyan Aevm Hindi Bhasha-I | Compulsory |
| 3. | Prayojanmulak Hindi-I | Compulsory |
| 4. | **Group-II (Min.1 Max.1)**<br>(ka)Vayvasaik Varg - Patrakarita Prashikshan-I | Optional |
| | (ka) Vyavsaik Varg - Bhasha Prodoyogiki-I | Optional |
| | (ka) Sahitya Varg - Vishesh Rachanakar Mohandas Nemeshray-I | Optional |
| | (Kha) Sahitya Varg - Prachin Evam Nirgun Bhakti Kavya-I | Optional |

## ✣ M.A. Part-I English : Sem-I
## (From Academic Year 2015-16 onwards)

| No. | Name of Paper | Compulsory / Optional |
|---|---|---|
| 1. | **Group -I (Min. 3 Max. 3)**<br>Literature in English - Poetry-I | Compulsory |
| 2. | Literature in English - Novel-I | Compulsory |
| 3. | Basic Concepts in Liguistics-I | Compulsory |
| | **Elective - Any one group and One paper from the following. But the same group will remain for the Part-II (for Dist. Student)** | |
| 4. | **Group-II (Min.1 Max.1)**<br>Indian English Novel-I | Optional |
| | 19th Century American Literature-I | Optional |
| | British Litre. From Chaucer to the end of the 17th Century-I | Optional |

❖ **M.A. Part-I English : Sem-II**
**(From Academic Year 2015-16 onwards)**

| *No.* | *Name of Paper* | *Compulsory / Optional* |
|---|---|---|
| 1. | **Group -I (Min. 3 Max. 3)**<br>Literature in English - Poetry-II | Compulsory |
| 2. | Literature in English - Novel-II | Compulsory |
| 3. | Basic Concepts in Liguistics-II | Compulsory |
| | **Elective - Any one group and One paper from the following. But the same group will remain for the Part-II (for Dist. Student)** | |
| 4. | **Group-II (Min.1 Max.1)**<br>Indian English Novel-II | Optional |
| | 19th Century American Literature-II | Optional |
| | British Litre. From Chaucer to the end of the 17th Century-II | Optional |

## २.२ प्रवेश पात्रता

(अ) कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाच्या कोणत्याही विद्याशाखेतील पदवी उत्तीर्ण असणारे विद्यार्थी एम. ए. भाग–१ साठी पात्र असतील.

(आ) एम. ए. भाग –१ मध्ये उत्तीर्ण झालेले विद्यार्थी.

## २.३ शिक्षणक्रम शुल्क (प्रथम वर्ष एम.ए.)

| | | |
|---|---|---|
| विद्यापीठ शुल्क | : | रु. २,०००=०० |
| अभ्यासकेंद्र शुल्क | : | रु. २,०००=०० |
| **एकूण शुल्क** | **:** | **रु. ४,०००=००** |

## विद्यापीठ शुल्काचा तपशील

| *अ.क्र.* | *शुल्काचे शीर्षक* | *शुल्क (रु.)* |
|---|---|---|
| ०१. | प्रवेश व नोंदणी शुल्क | १००=०० |
| ०२. | शैक्षणिक शुल्क | ८००=०० |
| ०३. | परीक्षा (अंतर्गत/अंतिम) शुल्क | ८००=०० |
| ०५. | संकीर्ण | १५०=०० |
| ०६. | विकास निधी | १५०=०० |
| | **एकूण शुल्क (रु.)** | **२,०००=००** |

## २.४ कालावधी

दोन वर्षे (एकूण चार सत्रे)

## २.५ माध्यम

मराठी, हिंदी, इंग्रजी.

## २.६ मूल्यमापन प्रक्रिया

विद्यार्थ्यांचे मूल्यमापन दोन प्रकारे केले जाते.

### अंतर्गत मूल्यमापन

अंतर्गत मूल्यमापनात प्रत्येक अभ्यासक्रमासाठी २० गुणांचा गृहपाठ देण्यात येईल. त्या गृहपाठातील प्रश्नांचे व गुणांचे स्वरूप पुढीलप्रमाणे राहील.

(१) गृहपाठ मूल्यमापनात किमान ४०% गुण प्राप्त करणे अनिवार्य राहील.

विद्यार्थ्यांना अंतर्गत मूल्यमापन व अंतिम परीक्षा मिळून किमान ४०% गुण प्राप्त करणे अनिवार्य राहील. अंतर्गत मूल्यमापन म्हणजे गृहपाठ पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याचा लाभ अंतिम मूल्यमापनासाठी देता येईल.

**महत्त्वाची सूचना**
**प्रत्येक अभ्यासक्रमात स्वतंत्रपणे उत्तीर्ण होण्यासाठी किमान ४० टक्के गुण मिळविणे अनिवार्य राहील.**

## २.७ श्रेयांक

सामान्यतः एका अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्याला ३० ते ३५ घड्याळी तासांचा वेळ लागतो. मुक्त शिक्षणपद्धतीत या अध्ययनतासांचे मापन 'श्रेयांका'च्या परिमाणात केले जाते. ३० ते ३५ अध्ययनतासांचा अभ्यास म्हणजे १ श्रेयांक. या अभ्यासात अध्ययन पुस्तकांचे वाचन, टिपणे काढणे, मनन–चिंतन करणे, प्रश्नोत्तरे लिहिणे, संपर्कसत्रातील मार्गदर्शन, इत्यादींचा समावेश आहे.

पदव्युत्तर पदवी परीक्षेसाठी एकूण ६४ श्रेयांकांचा अभ्यास पूर्ण करावा लागतो. प्रत्येक अभ्यासक्रम हा ४ श्रेयांकांचा आहे.

# ३. नोंदणी प्रक्रिया

या शिक्षणक्रमाची प्रवेशप्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येत आहे. खालील सूचनांचे आपण काटेकोरपणे पालन करावे.

(१) माहितीपुस्तिकेचा बारकाईने अभ्यास करावा. आपण शिक्षणक्रमाच्या प्रवेशास पात्र आहात याची खात्री आणि आपण पात्र असल्याचा पुरावा म्हणून खालील दस्तऐवजांची स्कॅन प्रत मिळवावी.

(अ) जन्मतारखेचा दाखला (वाहन परवाना किंवा पॅनकार्ड किंवा जन्मतारीख असलेले आधारकार्ड किंवा शाळा सोडल्याचा दाखला किंवा पासपोर्ट किंवा इलेक्शन कार्ड).

(आ) पात्रतेच्या परीक्षेचे गुणदानपत्र किंवा प्रमाणपत्र.

(इ) जर पात्रतेसाठी प्रवेश परीक्षा आवश्यक असेल तर सदरची प्रवेश परीक्षा पात्र झाल्याचे प्रमाणपत्र.

(ई) जर आपण मागासवर्गीय उमेदवार असाल तर आपल्या संवर्गासंदर्भातील नियमाप्रमाणे जातीचा दाखला, जात पडताळणी, नॉन क्रिमिलेअर सर्टिफिकेट, इत्यादी.

(उ) जर आपण अपंगत्व असलेले (उदा. अंधत्व असलेले विद्यार्थी असाल तर आपले अपंगत्व दर्शविणारी कागदपत्रे).

(२) आपणास किमान ७२ डीपीआय या रिझॉल्युशन बरहुकूम वरील सर्व दस्तऐवजांची स्कॅनिंग करणे आवश्यक आहे. यासाठी आपण आपल्या मित्रांची किंवा अभ्यासकेंद्राची मदत घेऊ शकता.

(३) आपणाकडे चालू स्थितीत असलेला भ्रमणध्वनी क्रमांक आणि वैध इ-मेल आयडी असणे गरजेचे आहे. इ-मेल आयडी मिळविण्यासाठी आपण gmail.com, outlook.com rediffmail.com किंवा yahoo.com. यासारख्या संकेतस्थळांवर भेट देऊन विनाशुल्क इ-मेल आयडी मिळवू शकतात. यांचा वापर आपणांस पासवर्ड, प्रवेशाची स्थिती, इत्यादी माहिती मिळविण्यासाठी केला जातो.

(४) आपणास विद्यापीठाचे शुल्क भरण्यासाठी डेबिट कार्ड किंवा क्रेडिट कार्ड किंवा इंटरनेट बँकिंग किंवा मोबाईल मनी आयडेंटिफायर (MMID) यांचा वापर करता येईल किंवा भारतीय स्टेट बँक यांच्या शाखांमध्ये किंवा विद्यापीठाने ठरवून दिलेल्या इतर राष्ट्रीयीकृत बँकांच्या शाखांमध्ये रोख स्वरूपात शुल्क भरता येईल. यासाठी आपण कोणत्या मार्गाने भरणा करता यावर अवलंबून राहून बँकांचे सेवाशुल्क भरावे लागेल. सदरचे बँकेचे शुल्क हे विद्यापीठ शुल्काच्या व्यतिरिक्त असतील. आपण आपल्या स्वतःच्या बँक खात्यामधूनच इलेक्ट्रॉनिक पद्धतीने शुल्काचा भरणा करावा असा आमचा सल्ला आहे कारण जर आपले शुल्क (विद्यापीठ आपली जबाबदारी काही तांत्रिक अडचणींमुळे पूर्ण करू शकत नसल्यास) परत करावे लागल्यास सदरचे शुल्क आपण ज्या खात्यातून विद्यापीठास शुल्क भरणा केली होती त्याच खात्यात शुल्काची परतफेड केली जाते. आपल्या स्वतःचे खाते असल्यास आपणास या सुविधेचा वापर करता येईल.

(५) स्वतःचे बचत खाते नसल्यास आपण शून्य बॅलन्स असलेले डेबिट कार्ड किंवा नेट बँकिंग फॅसिलिटी असलेले बचत खाते उघडू शकता. या खात्यांमध्ये किमान शिल्लक ठेवणे अनिवार्य नसते.

(६) नोंदणी प्रक्रियेसाठी इंटरनेट जोडणी असलेली संगणकाची सेवा घ्यावी लागते. जर तुमच्याकडे अशा प्रकारचे संगणक नसतील तर आपण सायबर कॅफे किंवा अभ्यासकेंद्रे किंवा मित्राकडील उपलब्ध संगणकाचा वापर करू शकता.

(७) आपण वर नमूद केल्याप्रमाणे पूर्वतयारी केल्यानंतर ऑनलाइन प्रवेशप्रक्रियेकडे वळू शकता. यासाठी आपण विद्यापीठाचे संकेतस्थळ http://ycmou.digitaluniversity.ac येथे क्लिक करा.

(८) जर तुमच्याकडे १६ अंकी कायम नोंदणी क्रमांक असेल तर आपणास या आशयाच्या हायपर लिंकवर क्लिक करावे लागेल. कृपया 'शैक्षणिक वर्ष २०१५-१६ च्या ऑनलाइन प्रवेशासाठी १६ अंकी कायम नोंदणी क्रमांक नसलेल्या अर्जदारांनी येथे क्लिक करा' येथे क्लिक करू नका. जरी आपणास एखाद्या शिक्षणक्रमाच्या प्रथम वर्षासाठी प्रवेश घ्यावयाचा असेल आणि आपणाकडे अगोदरच १६ अंकी कायम नोंदणी क्रमांक असेल तरीही 'शैक्षणिक वर्ष २०१५-१६ च्या ऑनलाइन प्रवेशासाठी १६ अंकी कायम नोंदणी क्रमांक नसलेल्या अर्जदारांनी येथे क्लिक करा' येथे क्लिक करू नका.

(९) तसेच जर तुमच्याकडे १६ अंकी कायम नोंदणी क्रमांक नसेल तर होम पेजवरील त्या आशयाच्या हायपर लिंकवर क्लिक करावे. चुकीचा पर्याय निवडू नये. आपणास संकेतस्थळावरील सूचनेप्रमाणे आपण इ-मेल आयडी, मोबाईल क्रमांक, इत्यादी माहिती भरून युजर आयडी आणि पासवर्ड मिळवावा लागेल.

(१०) ऑनलाइन पद्धतीने प्रवेश कसे मिळवावे यासंदर्भातील स्क्रिन शॉट असलेली एक पुस्तिका संकेतस्थळावर वेगळ्या पद्धतीने उपलब्ध करून दिलेली आहे. याचा वापर केल्यास आपणास ऑनलाइन अर्ज भरणे सोयीचे जाईल.

(११) जे विद्यार्थी छापील अध्ययन साहित्य (पुस्तके) घेऊ इच्छित नाहीत अशा विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ शुल्कात सूट उपलब्ध करून देण्यात आली आहे. सदरची सूट ठरावीक शिक्षणक्रमांसाठी उपलब्ध असून त्याची माहिती संगणकाच्या पडद्यावर मिळू शकेल तसेच माहितीपुस्तिकेत नमूद केलेली असेल. काही विद्यार्थ्यांना संगणकाच्या पडद्यावर उपलब्ध असलेल्या अध्ययन साहित्यातून अभ्यास करणे आवडते तसेच काही विद्यार्थ्यांकडे त्यांच्या मित्रांकडून जुने अध्ययन साहित्य उपलब्ध असू शकते अशा विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी सदरची सूट देण्यात येत आहे. विद्यापीठ पर्यावरणासंदर्भात सजग असल्याने विद्यार्थ्यांनी जुन्या पुस्तकांचा जास्तीतजास्त वापर करावा असे आवाहन करीत आहे.

(१२) आपण सर्व तपशील ऑनलाइन पद्धतीने सादर केल्यानंतर संगणकीय प्रणाली आपणांस स्कॅन केलेली कागदपत्रे सादर करण्यास (अपलोड करण्यास) सूचना करेल. आपण सादर

केलेल्या माहितीप्रमाणे आपणांस कोणकोणती कागदपत्रे सादर करावयाची आहेत याचा स्वयंचलित पद्धतीने अभ्यास करून संगणकीय प्रणाली सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशील ठरविते.

(१३) सर्व कागदपत्रे अपलोड केल्यानंतर आपण इलेक्ट्रॉनिक पद्धतीने (डेबिट कार्ड किंवा क्रेडिट कार्ड किंवा नेट बँकिंग किंवा मोबाईल बँकिंग) किंवा रोख पद्धतीने विद्यापीठ शुल्काचा भरणा कराल. ऑनलाइन पेमेंट गेटवे वापरून भरणा कसा करावयाचा याबाबत एक पुस्तिका विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(१४) रोखीने शुल्क अदा करावयाचे असल्यास आपणास इ–चलन प्रिंट करून घ्यावे लागेल. आपण सादर केलेल्या तपशिलाप्रमाणे सदरचे इलेक्ट्रॉनिक चलन संगणकीय प्रणाली तयार करते. सदरच्या चलनाच्या प्रिंटच्या दिनांकापासून दोन कार्यदिवस झाल्यानंतर भारतीय स्टेट बँक किंवा विद्यापीठाने ठरवून दिलेल्या राष्ट्रीयीकृत बँकांच्या आपण निवडलेल्या शाखांमध्ये आपण रोख स्वरूपात भरणा करू शकता. भरणा झाल्यानंतर बँकेच्या अधिकाऱ्याची स्वाक्षरी, मुद्रा (सील), ट्रॅन्झॅक्शन नंबर, सुवाच्य अक्षरात लिहिलेले आहे याची खात्री करावी.

(१५) आपणास ट्रॅन्झॅक्शन नंबर आपल्या विद्यापीठाच्या युजर आयडीवर लॉग इन करून सादर करता येईल.

(१६) आपण सादर केलेल्या कागदपत्रांची विद्यापीठ स्तरावरील छाननी झाल्यानंतर आपला प्रवेश निश्चित केला जाईल याची नोंद घ्यावी.

(१७) ऑनलाइन प्रवेश नोंदणी प्रक्रियेसाठी परिशिष्ट क्र. १ पहावे.

## ४. विभागीय केंद्रे

**(१) अमरावती :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे अमरावती विभागीय केंद्र,
व्ही.एम.व्ही. ते वलगाव रोड, पोस्ट व्ही.एम.व्ही.
अमरावती – ४४४ ६०४
✆ : (०७२१) २५३१४४५ फॅक्स : २५३१४४४

**(२) औरंगाबाद :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे औरंगाबाद विभागीय केंद्र
सर्व्हे नं. ४१, सैनिकी मुलांच्या वसतिगृहाच्या पूर्वेस
नंदनवन कॉलनी, छावणी,औरंगाबाद – ४३१ ००२
✆ : (०२४०) २३७१०७७ / २३७१०६६
फॅक्स : (०२४०) २३७१०८८

**(३) मुंबई :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे मुंबई विभागीय केंद्र
द्वारा : जगन्नाथ शंकरशेठ म.न.पा.ची मराठी शाळा,
दुसरा मजला, फ्रेअर ब्रीज (साऊथ), नाना चौक
ग्रँट रोड (प.) मुंबई – ४०० ००७
✆ : (०२२) २३८७४१८६,२३८७४१७७,
२३८२६१३५ फॅक्स : २३८१३२५६

**(४) नागपूर :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे नागपूर विभागीय केंद्र
रावबहादूर डी., लक्ष्मीनारायण बंगला
विद्यापीठ क्रीडा परिसर, लॉ कॉलेज कॅम्पस
रविनगर चौक, नागपूर – ४४० ००१
✆ : (०७१२) २५५३७२४
फॅक्स : २५५३७२५

**(५) नाशिक :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे नाशिक विभागीय केंद्र,
नाशिक महानगरपालिकेची जुनी इमारत,
दुसरा मजला, नवीन पंडित कॉलनी
नाशिक –४२२ ००२
✆ : (०२५३) २३१७०६३
फॅक्स : २५७६७५६

**(६) पुणे :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे पुणे विभागीय केंद्र
शाहीर अण्णाभाऊ साठे प्रशालागृह, महापालिका शाळा
क्र.५ (मुलांची), ६५४, सदाशिव पेठ हौदासमोर
कुमठेकर मार्ग, पुणे –४११ ०३०
✆ : (०२०) २४४५७९१४
फॅक्स : २४४९११०७

**(७) कोल्हापूर :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे कोल्हापूर विभागीय केंद्र
शिवाजी विद्यापीठ परिसर पोस्ट ऑफीसजवळ
विद्यानगर, कोल्हापूर – ४१६ ००४
✆ : (०२३१) २६०७०२२
फॅक्स : २६०७०२३

**(८) नांदेड :** य.च.म.मुक्त विद्यापीठाचे नांदेड विभागीय केंद्र
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ क्रीडा इमारत
नांदेड – ४२१ ६०६
✆ : (०२४६२) २८३०३८, २२९९४०
फॅक्स : २२९९५०

## ५. विशेष सूचना / संपर्कासाठी

### (अ) प्रवेश–अर्ज भरण्यासंबंधीच्या सूचना

०१. प्रवेश–अर्ज भरण्यापूर्वी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेली माहितीपुस्तिका वाचावी.

०२. प्रवेश–अर्जातील सर्व माहिती पूर्ण भरावी.

०३. विद्यापीठाकडून मिळालेले ओळखपत्र हरविल्यास रु. १५ आणि गुणपत्रक हरविल्यास रु. ५० (एकत्रित गुणपत्रक रु. १००/–) भरून दुसरी प्रत मिळेल. त्यासाठी शुल्काबरोबर आपले नाव, नोंदणी क्रमांक, वर्ग व अभ्यासकेंद्र ही माहिती कळविणे आवश्यक आहे. ही रक्कम डी.डी.ने पाठवावी. गुणपत्रकासाठी रु. ५०/– अथवा रु. १००/– च्या बॉण्ड पेपरवर प्रतिज्ञापत्र (Affidavit) सादर करणे आवश्यक आहे.

## (आ) अभ्यासकेंद्रासंबंधीच्या सूचना

०१. प्रवेशाची मुदत संपल्यानंतर संपर्कसत्रे केव्हा सुरू करण्यात येतील, त्यासंबंधी अभ्यासकेंद्रावर जाऊन वेळापत्रक पाहावे. ओळखपत्रावर अभ्यासकेंद्र प्रमुखांची स्वाक्षरी व शिक्का घ्यावा.

०२. अभ्यासकेंद्राशी सतत संपर्क ठेवणे आपल्या हिताचे आहे.

०३. विद्यापीठाने केलेल्या नियोजनाप्रमाणे अंतिम परीक्षा अभ्यासकेंद्रावर घेण्यात येतात, त्यात बदल केला जात नाही.

०४. अभ्यासकेंद्रावर पुरेशी विद्यार्थी नोंदणी झाली नसल्यास विद्यार्थ्यांना जवळच्या केंद्रावर संपर्कसत्र व परीक्षेस वर्ग (Transfer) करण्यात येईल.

०५. **प्रथम वर्षाला ज्या नावाने प्रवेश घेतलेला आहे, त्याच नावाने पदव्युत्तर प्रमाणपत्र मिळेल. त्यात बदल होणार नाही.**

## (इ) विद्यापीठाचे मुख्यालय

'ज्ञानगंगोत्री परिसर', गंगापूर धरणाजवळ, नाशिक ४२२ २२२. दूरध्वनी क्र. (०२५३) २२३१७१४, २२३१७१५, २२३०२२७.

**विद्यापीठ व विभागीय केंद्र यांच्या कार्यालयीन वेळा पुढीलप्रमाणे आहेत –**

- सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.४५
  (दुपारी १.३० ते २ सुटी)
- रविवार, प्रत्येक महिन्याचा पहिला व तिसरा शनिवार आणि शासकीय सुटीच्या दिवशी वरील कार्यालये बंद राहतील.

## ■ विशेष अडचणींबाबत संपर्क

१. **माहितीपुस्तिका, प्रवेश–अर्ज, अभ्यासकेंद्र अडचणी :**
विभागीय संचालक, विभागीय केंद्र

२. **अभ्यासक्रम (विषय) यांतील अडचणी :**
संचालक, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
दूरध्वनी – (०२५३) २२३१४७५

३. **नोंदणी, नोंदणी क्रमांक, पत्ताबदल, केंद्रबदल :**
संबंधित विभागीय केंद्र

४. **परीक्षा, परीक्षा–अर्ज, परीक्षा क्रमांक, निकाल, पदवी प्रमाणपत्र, इत्यादी**
परीक्षा नियंत्रक, परीक्षा विभाग
दूरध्वनी – (०२५३) २२३०७१६
मोबाईल – ०९४२२२४७२९०

५. **अध्ययन–साहित्य, पुस्तके, कार्यपुस्तिका, इत्यादी :**
भांडार व्यवस्थापक, भांडार व जावक कक्ष
दूरध्वनी – (०२५३) २२३०१०७

## परिशिष्ट १ : नोंदणी प्रक्रिया प्रवाहदर्शिका


**Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik**

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**

ज्ञानगंगा घरोघरी

### Online Admission Process Flow for Candidate not having 16 Digit P.R.N.

### 16 अंकी P.R.N. नसलेल्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया



Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

# Online Admission Process Flow for Candidate who already have 16 Digit P.R.N.

# ज्या विद्यार्थ्यांकडे 16 अंकी PRN आहे त्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया



From anywhere personally or with a help of MKCL center, Go to Digital University website. [कोठूनही स्वत: किंवा एमकेसीएल केंद्राच्या मदतीने विद्यापीठाच्या ycmou.digitaluniversity.ac या DU वेब-साईटवर जा.]




For Admission to second/third year, Click on "Online Application AY2015-16 for students having 16 digit PRN" link. [द्वितीय/तृतीय वर्षाला ऑनलाईन प्रवेश घेण्यासाठी, स्क्रीनवर दिसणाऱ्या 3 पैकी "Online Application AY2015-16 for students having 16 digit PRN" या लिंकवर क्लिक करा]




Login to your account. Use PRN as user ID and birth date as password. [PRN हा युझर आयडी व जन्म तारीख हा पासवर्ड म्हणून वापरून लॉगइन करा.]



To apply for admission, Click on link, "Admission to Second/Third year". [द्वितीय/तृतीय वर्षाला ऑनलाईन प्रवेश घेण्यासाठी, संगणक स्क्रीन admission to Second/Third year या लिंकवर क्लिक करा.]



Student can change & select study center of choice, if S/he desires. [प्रस्तुत स्क्रीन वापरून, इच्छा असल्यास, विद्यार्थी सध्याचे अभ्यास केंद्र बदलू शकतो.]



Select medium of instruction and subjects [अध्ययनाच्या भाषेची व विषयांची निवड येथे करा.]



Select fee category and fee details [फी संबंधी योग्य पर्याय व तपशिलाची निवड येथे करा.]




Select payment mode (online or echalan) [फी बँकेत भरण्याच्या पर्यायाची (डेबिट क्रेडीट कार्ड द्वारे ऑन-लाईन वा इ-चलनाने) निवड येथे करा.]





Pay admission fees online or Print eChalan and Pay Fees in bank next day. Print admission form. [ऑन-लाईन पद्धतीने अथवा चलनाची प्रिंट घेऊन बँकेत दुसऱ्या दिवशी फी भरा. प्रवेश अर्जाची प्रिंट घ्या.]



Everyday YCMOUs finance department will download (both online & echalan payment) MIS file from bank's website and upload it to DU website for auto-reconciliation of financial transactions. [विद्यापीठ दररोज बँकेच्या वेब-साईटवरील ऑनलाईन व इ-चलन आर्थिक देवाण घेवाण MIS फाईल डाऊन-लोड करून DU वेब-साईटवर आर्थिक जुळवणीसाठी उपलोड करील.]



YCMOU will verify fee category, fee paid, documents and approve/reject application online. [मुक्त विदयापीठ, फी संवर्गाची योग्य निवड, पूर्ण फी भरल्याची खात्री करील व कागदपत्रांची ऑनलाईन तपासणी करून विद्यार्थ्यांचा अर्ज मंजूर/नामंजूर करतील.]




Student will be communicated accordingly by SMS. Student who's application is rejected can make correction either in fee category, pay balance fee online or by e-chalan and/or upload correct document. [प्रवेश-अर्ज मंजूर/नामंजूर झाल्याचा SMS विद्यार्थ्यास जाईल. प्रवेश-अर्ज नामंजूर झालेला विद्यार्थी, ऑन-लाईन पद्धतीने फी संवर्गातील चुक दुरुस्ती करून बँकेत ऑन-लाईन अथवा इ-चलनाने फी भरेल आणि/ अथवा योग्य कागदपत्र उपलोड करील.]




Student will get SMS when admission process is completed. S/he will submit application form with echalan copy to study center. Name and addresses of students with payment status approved, will be available online for dispatch of learning material. [प्रवेश-प्रक्रिया पूर्ण झाल्यावर विद्यार्थ्यास SMS येईल. विद्यार्थी इ-चलनासह प्रवेश अर्ज अभ्यासकेंद्रावर देईल. फी भरल्याची खात्री झालेल्या विद्यार्थ्यांची माहिती अध्ययन साहित्य पाठविण्यासाठी ऑन-लाईन उपलब्ध होईल.]

## परिशिष्ट २ : उमेदवार / विद्यार्थी करारनामा

### उमेदवार / विद्यार्थी करारनामा

हा करार विद्यार्थी किंवा उमेदवार आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (यचममुवि) यांच्यामध्ये, विद्यार्थी / उमेदवार याने 'Accept' ह्या बटनावर क्लिक केल्यामुळे आपोआप अस्तित्वात आलेला आणि दोन्ही पक्षांना मान्य, कबूल आणि वैध असलेला मानण्यात येईल.

या करारनाम्यात 'उमेदवार' या संज्ञेचा वापर अशा व्यक्तींसाठी करण्यात आला आहे की जो यचममुविमार्फत राबविण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमात प्रवेश घेऊ इच्छितो आणि 'विद्यार्थी ' या संज्ञेचा वापर अशा व्यक्तींसाठी करण्यात आलेला आहे, ज्या व्यक्तीने यचममुविमार्फत राबविण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमास विहित पद्धतीचा अवलंब करून प्रवेश घेतला आहे.

उमेदवार असे मान्य व कबूल करितो की,

१) त्याने माहितीपुस्तिका तसेच संगणक पडद्यावर उपलब्ध असलेल्या मजकुराचा, माहितीचा, सूचनांचा व्यवस्थित पद्धतीने अभ्यास केला आहे आणि त्यानुसार योग्य त्या कृती केल्या आहेत.

२) त्याने ही खात्री करून घेतलेली आहे की, त्याने निवडलेल्या शिक्षणक्रमास तो पात्र आहे आणि जर तो माहितीपुस्तिका आणि / किंवा संगणक पडद्यावर उपलब्ध माहितीप्रमाणे अपात्र ठरत असेल तर त्याचा प्रवेश ताबडतोब रद्द करण्यात येईल आणि त्याने विद्यापीठात भरलेले शुल्क त्यास आंशिक किंवा पूर्ण स्वरूपात परत मिळणार नाही.

३) त्याने त्यास अध्ययन साहित्य (पुस्तके) कोणत्या स्वरूपात (छापील पुस्तके, इ–बुक, मोबाईल ॲप, दृकश्राव्य फिती, ध्वनिफिती सीडीवर किंवा इंटरनेटवर उपलब्ध असलेला मजकूर) उपलब्ध होणार आहे याची माहिती माहितीपुस्तिकेच्या संबंधित भागातून मिळविली आहे. आणि सदर स्वरूपात अध्ययन साहित्य उपलब्ध होणार आहे याबाबत त्याचे कोणतेही आक्षेप नाहीत आणि तो यापुढे कधीही अध्ययन साहित्य माहितीपुस्तिकेत दिलेल्या स्वरूपापेक्षा वेगळ्या स्वरूपात मिळण्याची मागणी करणार नाही.

४) तो यचममुवि संदर्भातील कोणतीही तक्रार किंवा इतर कोणतेही निवेदन त्यास सादर करावयाचे असल्यास अशी तक्रार किंवा निवेदन तो यचममुविमार्फत उपलब्ध असलेल्या संगणकीय प्रणालीचा (युजर आयडीचा) वापर करून करेल. अशी तक्रार किंवा निवेदन तो तक्रार किंवा निवेदनाचे उद्‌भवणाऱ्या कारणांच्या दिनांकाच्या तीस दिवसांच्या आत संगणकीय प्रणालीचा वापर करूनच करेल.

५) त्यास हे मान्य व कबूल आहे की, विद्यापीठाला शिक्षणक्रम राबविण्याच्या नियमांमध्ये, धोरणांमध्ये, अध्ययन साहित्यामध्ये, पाठ्यक्रमात बदल करण्याचा अधिकार आहे आणि अशा नियमांमधील धोरणांमधील, अध्ययन साहित्यामधील, पाठ्यक्रमामधील बदल त्यास बंधनकारक असतील आणि याबाबत त्याची कोणतीही तक्रार असणार नाही.

६) तो शिक्षणक्रमाच्या कालावधीमध्ये विद्यापीठात नोंदविलेल्या त्याच्या भ्रमणध्वनी क्रमांकात बदल करणार नाही.

७) त्यास हे मान्य व कबूल आहे की, त्याने नोंदणीच्या वेळेस विद्यापीठात सादर केलेल्या माहितीत बदल करणे (फोटोग्राफ, भ्रमणध्वनी क्रमांक, जन्मतारीख, पत्ता, इत्यादीसाठी) योग्य ते शुल्क आकारण्याचे अधिकार विद्यापीठाने राखून ठेवले आहेत.

८) त्यास हे मान्य व कबूल आहे की, जर विद्यापीठास शासनाकडून (शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांसंदर्भात) त्याचे शुल्क प्राप्त झाले नाही तर अशा विद्यार्थ्यांना परीक्षा देण्यास मज्जाव करण्यात येईल आणि जर परीक्षा दिलेली असेल तर त्याचा निकाल तेव्हापर्यंत राखून ठेवण्यात येईल जेव्हापर्यंत त्याचे शुल्क विद्यापीठास प्राप्त होत नाही.

९) त्यास याचीही कल्पना आहे की, त्याच्याकडून कोणतीही असत्य, अपुरी माहिती दिली गेल्यास त्याचा प्रवेश रद्द करण्यात येईल आणि जर त्यास पदवी किंवा पदविका निर्गमित करण्यात आलेल्या असतील तर अशा प्रकारे असत्य, अपूर्ण माहिती मिळाल्याचे सिद्ध झाल्यानंतर त्याची पदवी, पदविका रद्दबातल करण्यात येईल.

१०) तो विद्यापीठाचे संकेतस्थळ (ycmou.digitaluniversity.ac. OR ycmou.ac.in) येथे नियमितपणे भेट देईल आणि तेथे देण्यात आलेल्या शैक्षणिक किंवा प्रशासकीय स्वरूपाच्या सूचनांचे (उदाहरणार्थ, परीक्षा हॉलतिकीट डाऊनलोड करणे आणि त्याची छपाई करणे) काटेकोरपणे पालन करेल.

११) तो विद्यापीठाच्या शिक्षणक्रमाचा अभ्यास अपेक्षित असलेल्या परिश्रम, शिस्त, प्रामाणिकपणे करेल. तसेच आपले वर्तन विद्यापीठाचा सुयोग्य विद्यार्थ्याप्रमाणे करेल आणि अशी कोणतीही कृती करणार नाही की जी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यास शोभणार नाही.

## परिशिष्ट २ : Candidate/Student Agreement at the time of Admission

### Candidate/Student Agreement at the time of Admission

This is an agreement between the student or candidate and the YCMOU which is entered into by virtue of the candidate for admission clicking on "ACCEPT" button on the online admission portal at the time of admission to a program using online admission process.

In this agreement the term "candidate" is used to mean the person who proposes to take admission to a program in YCMOU and the term "student" is used to mean a person who has been admitted to a program of the YCMOU after fulfilling all the conditions thereof.

The candidate undertakes that -

1. He has gone through the prospectus and the on-screen narrations or directions and has sincerely responded to the on-screen directions.
2. He has ensured that he is eligible to the program to which he proposes to take admission and that if it is found otherwise, (that is, if he is found not to be fulfilling the conditions of the eligibility at any time as per the rules mentioned in the prospectus or the on-line narrations) his admission will be summarily cancelled and the fees paid to the university will not be refunded in part or in full.
3. The information about the medium/mode of delivery of the Study Material (for example printed books, e-books, mobile app, audio/video material available on internet or through CD/DVD, etc) has been duly studied by me in the relevant pages of the prospectus and I have no objection to the said mode of delivery. He shall not make any demands on the methods or medium of delivery other than that mentioned in the prospectus.
4. He shall make any representations to the YCMOU by logging on as a student in respect of any activities of grievances within a period of thirty days from the date of cause of the grievances or by an email to the university at the designated e-mail address.
5. He understands that the University reserves right to make changes in the rules or syllabi or learning material or any other policy matter as a matter of urgency and that such changes in the rules, syllabi or policy matters shall be binding and applicable on him and that he shall not make objections to such changes.
6. He shall not change his mobile number as registered with the University during the time of admission to the program.
7. He understands that the University shall levy charges on changes in profiles of the student, including the photograph, mobile number, date of birth, etc.
8. He understands that in case the University does not receive the fees from the Government (in case of Scholarship or Free-ship candidates), the student may be barred from taking examinations and his results shall not be declared till such time that the fees have been received.
9. He understands that any incorrect or incomplete information given by him is liable to cancellation of his admission or withdrawal of degree or diploma awarded to him as and when the university gets to know of such supply of incomplete or incorrect information.
10. He shall visit the University's website (ycmou.digitaluniversity.ac and ycmou.ac.in) regularly and undertake necessary steps for academic and administrative purposes as expected from him including downloading of the examination hall ticket and printing the same.
11. He shall undertake the studies of the academic program with necessary industry, discipline and honesty and conduct himself with due dignity and shall do nothing which is unbecoming of a student of the YCMOU.

## परिशिष्ट ३ : गरीब विद्यार्थी साहाय्य योजना नियमावली

१. **नाव :** या योजनेचे नाव गरीब विद्यार्थी साहाय्य योजना असे राहील.

२. **व्याप्ती :**

२.१ सदरची गरीब विद्यार्थी साहाय्य योजना यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या एका वर्षापेक्षा अधिक कालावधीच्या सर्व शिक्षणक्रमांच्या विद्यार्थ्यांना लागू राहील.

२.२ अंध, अपंग, मूकबधिर, कर्णबधिर विद्यार्थ्यांसाठी संपूर्ण फी, मार्कांची सवलत व्यवस्थापन मंडळाने घेतलेल्या निर्णयान्वये देय राहील.

२.३ आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी सदर योजना लागू असेल.

३. **पात्रतेचे निकष :**

३.१ गरीब विद्यार्थी साहाय्य योजनेचा लाभ मिळण्यासाठी कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नाची कमाल मर्यादा रु. १,००,०००/– राहील.

३.२ तहसिलदाराचे मूळ उत्पन्नाचे प्रमाणपत्र मागील वित्तीय वर्षाचे असावे.

३.३ सदर योजनेचा लाभ देताना संबंधित विद्यार्थी / विद्यार्थिनी मागील शैक्षणिक वर्षाच्या अंतिम परीक्षेत उत्तीर्ण असणे आवश्यक राहील.

३.४ गरीब विद्यार्थी सहाय्य योजनेसाठी विद्यार्थ्याने मागील वर्षी योजनेचा लाभ घेतला असेल तर सदर विद्यार्थी सर्व विषयांत उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

३.५ सदर योजनेसाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीने त्याला ज्या शैक्षणिक वर्षासाठी योजनेचा लाभ मंजूर करण्यात आला तो अभ्यासक्रम त्याने / तिने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त अभ्यासकेंद्रातून पूर्ण करणे आवश्यक आहे. अभ्यासक्रमाचे वर्ष पूर्ण होण्यापूर्वी संबंधित विद्यार्थ्याचा प्रवेश कोणत्याही कारणास्तव रद्द झाल्यास विद्यापीठाने प्रदान केलेली रक्कम व प्रमाणपत्र विद्यापीठास परत करण्याची जबाबदारी संबंधित विद्यार्थी, अभ्यासकेंद्र व विभागीय केंद्र यांची राहील.

३.६ राज्य शासन / केंद्र शासन यांच्याकडे शिष्यवृत्ती मिळण्यासाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ देय नाही.

३.७ रु. ३,०००/– पेक्षा कमी फी असलेल्या शिक्षणक्रमाकरिता ही योजना लागू नाही.

४. **योजनेची गुणांची निकष पद्धत :**

| | | |
|---|---|---|
| ४.१ | विद्यार्थी शहरी भागातील असल्यास | १ गुण |
| ४.२ | विद्यार्थी ग्रामीण भागातील असल्यास | २ गुण |
| ४.३ | विद्यार्थी अतिदुर्गम भागातील असल्यास | ३ गुण |
| ४.४ | प्रकल्पग्रस्त असल्यास | २ गुण |
| ४.५ | खेळाडू असल्यास (विभागीय / राज्य पातळी) | ४ गुण |
| ४.६ | उत्पन्न मर्यादा रु. ३५०००/– पर्यंत | ३ गुण |
| ४.७ | उत्पन्न मर्यादा रु. ७००००/– पर्यंत | २ गुण |
| ४.८ | उत्पन्न मर्यादा रु. १,००,०००/– पर्यंत | १ गुण |

५. **अनुज्ञेय रक्कम :** अनुज्ञेय रक्कम या योजनेसाठी निश्चित केलेल्या निकषांनुसार प्राप्त गुणांच्या आधारे व शिक्षणक्रम पातळीनिहाय ठरविलेल्या रकमेच्या आधारे निश्चित केली जाईल.

५.१ पदविका शिक्षणक्रम : रु. ३,०००/– किंवा शिक्षणक्रमाचे शुल्क यापैकी जे कमी असेल ती रक्कम

५.२ पदवी शिक्षणक्रम : रु. ५,०००/– किंवा शिक्षणक्रमाचे शुल्क यापैकी जे कमी असेल ती रक्कम

५.३ पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा शिक्षणक्रम : रु. ५,०००/– किंवा शिक्षणक्रमाचे शुल्क यापैकी जे कमी असेल ती रक्कम

५.४ पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रम : रु. ७,०००/– किंवा शिक्षणक्रमाचे शुल्क यापैकी जे कमी असेल ती रक्कम

५.५ गरीब विद्यार्थी साहाय्य निधी योजनेकरिता अर्थसंकल्पातील अंदाजपत्रकीय तरतूद आरक्षण विभागातर्फे त्या–त्या शैक्षणिक वर्षात करण्यात येईल.

५.६ अनुज्ञेय रक्कम उदाहरण दाखल तक्ता :

| अ.क्र. | किमान गुण | अनुज्ञेय रकमेचे प्रमाण % | डिप्लोमा | पदवी / पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा | पोस्ट ग्रॅज्युएट डिग्री |
|---|---|---|---|---|---|
| | | | रु. ३०००/- | रु. ५०००/- | रू. ७०००/- |
| १ | ०२ | ३० | रु. ९०० | रु. १५०० | २१०० |
| २ | ३ ते ५ | ५० | रु. १५०० | रु. २५०० | ३५०० |
| ३ | ६ च्या पुढे | १०० | रु. ३००० | रु. ५००० | ७००० |

६ गरीब विद्यार्थी साहाय्य योजनेअंतर्गत मदत मिळण्यासाठी अर्ज सादर करण्याची पद्धत :

६.१ गरीब विद्यार्थी साहाय्य निधी योजनेचा विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक सहपत्रे जोडून अभ्यासकेंद्राकडे दिलेल्या मुदतीत सादर करणे आवश्यक राहील.

६.२ विद्यार्थ्याने सादर केलेल्या विहित नमुन्यातील अर्जावर अभ्यासकेंद्र प्रमुख / संयोजक यांचा सही व शिक्का असणे बंधनकारक राहील.

६.३ अर्जातील प्रतिज्ञापत्रावर विद्यार्थ्यांची सही व राष्ट्रीयीकृत बँकेचा तपशील म्हणजे बँकेचे नाव, शाखा, खाते क्रमांक, आय एफ एस सी (IFSC) कोड या बाबी नोंदवणे आवश्यक आहे.

६.४ मागील वर्षी सदर योजनेचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी मागील वर्षीच्या गुणपत्रिकेची झेरॉक्स प्रत जोडली आहे काय? ते मागील वर्षाच्या परीक्षेत उत्तीर्ण आहेत का? हे अभ्यासकेंद्र प्रमुखांनी पहावे.

६.५ अभ्यासकेंद्रप्रमुखांनी विद्यार्थ्यांकडून अर्ज निर्धारित मुदतीत भरून घेऊन विभागीय केंद्रांकडे सादर करावेत.

६.६ अभ्यासकेंद्राने विभागीय केंद्राकडे सादर केलेल्या अर्जाची छाननी वरील निकषांच्या आधारे विभागीय केंद्राने करावी. तसेच विद्यापीठाने दिलेल्या विहित नमुन्यातील माहिती Excel Sheet मध्ये Hard Copy/ Soft Copy तयार करावी.

६.७ शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना पूर्वीच्याच नियमाप्रमाणे गरीब विद्यार्थी साहाय्य प्रदान करण्यात येईल.

६.८ शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना नवीन नियमांच्या आधारे गरीब विद्यार्थी साहाय्य योजनेची रक्कम प्रदान करण्यात येईल.

६.९ प्रत्येक शैक्षणिक वर्षात दिनांक १५ ऑक्टोबरपर्यंत अभ्यासकेंद्रांनी गरीब विद्यार्थी सहाय्य योजनेचे अर्ज जमा करावेत व विभागीय केंद्रांनी दिनांक १५ नोव्हेंबरपर्यंत सदरचे अर्ज व तक्त्यातील माहिती उपकुलसचिव, आरक्षण कक्ष यांच्याकडे सादर करावी.

६.१० पात्र विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ मंजूर केल्याबाबतची अंतिम यादी जानेवारीमध्ये विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर केली जाईल.

## परिशिष्ट ४ : University Grants Commission Resolution (2004)

विश्वविद्यालय अनुदान आयोग
बहादुरशाह जाफर मार्ग
नई दिल्ली–११० ००२
**UNIVERSITY GRANTS COMMISSION**
**BAHADURSHAH ZAFAR MARG**
**NEW DELHI-110002**

ज्ञान-विज्ञानं विमुक्तये

F1-52/2000(CPP-II) 5 MAY 2004

The Registrar / Director
Of all the Indian Universities
(Deemed, State, Central Universities /
Institutions of National importance)

Subject : Recognition of Degrees awarded by Open Universities.

Sir/Madam,

There are a number of open Universities in the country offering various degrees/diploma through the mode of non-formal education. **The Open Universities have been established in the country by an Act of Parliament or State Legislature in accordance with the provisions contained in Section 2(f) of University Grants Commission Act, 1956. These universities are, therefore, empowered to award degrees in terms of Section 22(1) of the UGC Act, 1956.**

A circular was earlier issued vide UGC letter N.F.1-8/92(CPP) dated February, 1992 mentioning that the Certificate, Diplomas and Degrees awarded by Indira Gandhi National Open University are to be treated equivalent to the corresponding awards of the Universities in the country.

Attention is further invited to UGC circular No.F1-25/93(CPP-II) dated 28th July, 1993 (copy enclosed) for recognition of degrees and diplomas as well as transfer of credit for courses successfully completed by students between the two types of universities so that the mobility of students from Open University stream to traditional Universities is ensured without any difficulty.

The UGC has specified the nomenclature of degrees under Section 22(3) of the UGC Act, 1956 to ensure mandatory requirements viz. minimum essential academic inputs required for awarding such degrees. A copy of Gazette Notification regarding specification of degrees issued vide No.1-52/97(CPP-II) dated 31st January 2004 is enclosed. The details are also given in UGC Web site : www.ugc.ac.in

**May, I therefore request you to treat the Degrees / Diploma / Certificates awarded by the Open Universities in conformity with the UGC notification on Specification of Degrees as equivalent to the corresponding awards of the traditional Universities in the country.**

Yours faithfully

**(Dr. Mrs. Pankaj Mittal)**
**Joint Secretary**

**Encl. : As Above**
**Copy to :**

1. The Secretary, Government of India, Ministry of Human Resource Development, Department of Secondary Education and Higher Education, Shastri Bhavan, New Delhi-110001.
2. The Secretary, All Indian Council for Technical Education, I.G. Sports Complex, Indraprastha Estate, New Delhi
3. The Secretary, Association of Indian Universities (AIU), 16, Comrade Inderjit Gupta Marg, New Delhi -110002.
4. The Secretary, National Council for Teacher Education, I.G. Stadium, I. P. Estate, New Delhi-110002.
5. The Director of Distance Education Council, IGNOU Campus, Maidan Garhi, New Delhi-110068.
6. The Vice-Chancellor, Indira Gandhi National Open University, Maidan Garhi, New Delhi-110068.
7. The Vice-Chancellor, Dr. B. R. Ambedkar Open University, Road, No. 46, Jubilee Hills, Hyderabad (AP)
8. The Vice-Chancellor, Nalanda Open University, West Gandhi Maidan, Patna-800001 (Bihar)
9. The Vice-Chancellor, Dr. Babasaheb Ambedkar Open University, Shahigaug, Ahmedabad-380003 (Gujarat)
10. The Vice-Chancellor, Karnataka State Open University, Manasagangotri, Mysore-570006 (Karnataka)
11. The Vice-Chancellor, Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik-422222 (Maharashtra)
12. The Vice-Chancellor, Kota Open University, Vardhaman Mahaveer Open University, Kota-324010 (Rajasthan)
13. The Vice-Chancellor, Netaji Subhash Open University, Kolkata-700020 (West Bengal)
14. The Vice-Chancellor, Madhya Pradesh Bhoj (Open) University, Bhopal-462016 (M.P.)

**(V.K. Jaiswal)**
**Under Secretary**

**परिशिष्ट ५ :** G.R. of equivalency to 10th and 12th

**यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक व**
**राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षण संस्था, नवी दिल्ली यांची**
**प्रमाणपत्रे शासनसेवेसाठी समकक्ष म्हणून विचारात घेण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक : आरजीडी–१५११/प्र.क्र.८९/१३,
मंत्रालय, विस्तार इमारत, मुंबई–४०००३२
दिनांक : २० मे, २०११.

वाचा

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : आरजीडी–१३९८/प्र.क्र.६७/९८/१३, दिनांक १० डिसेंबर, १९९८.
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : आरजीडी–१३०५/प्र.क्र.२४/२००५/१३, दिनांक १२ डिसेंबर, २००६.

**शासन निर्णय :**

यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक येथून प्राप्त केलेली शैक्षणिक अर्हता शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी ग्राह्य धरण्याबाबत सर्वसाधारण सूचना निर्गमित करण्याचे निदेश मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण, मुंबई यांनी श्री. राजेंद्र घुणकीकर विरुद्ध महाराष्ट्र शासन (मूळ अर्ज क्र. ६७०/२००८) वर दिले आहेत. त्यावर, शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार यासंदर्भात खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. ''ज्या पदांच्या सेवाप्रवेश नियमात १० वी/१२ वी (माध्यमिक/उच्च माध्यमिक) परीक्षा उत्तीर्ण असणे अशी किमान अर्हता विहित केलेली असेल त्या बाबतीत, महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाची माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण नसलेला मात्र, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाची पूर्व परीक्षा उत्तीर्ण होऊन पदवी परीक्षेचे प्रथम वर्ष उत्तीर्ण झालेला **वा** यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातून पदवी धारण केलेला उमेदवार पात्र समजण्यात यावा.''

२. बृहन्मुंबईतील लिपिक–टंकलेखक पदावरील नियुक्तीसाठी विहित करण्यात आलेल्या सेवाप्रवेश नियमातील २ (इ) मध्ये ''महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाने नियंत्रित केलेली माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा आणि या परीक्षेस समकक्ष घोषित केलेल्या इतर परीक्षा अंतर्भूत असल्याचे नमूद केले आहे.'' तसेच, उमेदवारांकडे महाराष्ट्र राज्यातील अधिवास प्रमाणपत्र असणेही आवश्यक आहे. राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षण संस्थान, नवी दिल्ली या विद्यालयाची माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण केलेल्या एका उमेदवाराने महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकारणाकडे दाखल केलेल्या प्रकरणात (मूळ अर्ज क्रमांक २०४/२०१०) राज्य शासनाने लवकरात लवकर निर्णय घ्यावा, असे आदेश दिले आहेत. केंद्र शासनाने कायद्यान्वये स्थापन केलेल्या राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षण संस्था, नवी दिल्ली (National Institution of Open Schooling, New Delhi) या विद्यालयाची माध्यमिक शालांत परीक्षा (किमान ५ विषयांसह) उत्तीर्ण केलेल्या उमेदवारांना शालेय शिक्षण विभागाने अकरावी प्रवेशासाठी पात्र ठरविले आहे. मात्र, शासन सेवेतील नियुक्तीसंदर्भात समकक्षतेबाबत कोणतेही आदेश नाहीत. केंद्रिय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने सर्व राज्यांना, राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षण संस्था, नवी दिल्ली (National Institute of Open Schooling, New Delhi) यांच्याकडून दिली जाणारी प्रमाणपत्रे उच्च शिक्षण व नोकरीसाठी (Employment) ग्राह्य (समकक्ष) धरण्याबाबत कळविले आहे. ही बाब विचारात घेऊन, राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षण संस्था, नवी दिल्ली यांच्यामार्फत माध्यमिक शालांत परीक्षेबाबत दिलेले प्रमाणपत्र, माध्यमिक शालांत परीक्षा अशी अर्हता असलेल्या पदांवर नियुक्तीसाठी ग्राह्य धरण्याची बाब देखील शासनाच्या विचाराधीन होती. त्यावर, शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार यासंदर्भात खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

''राष्ट्रीय मुक्त विद्यालय संस्था, नवी दिल्ली यांची (मराठी व इंग्रजीसह किमान ५ विषयांसह) शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व सदर प्रमाणपत्र (Secondary School Examination Certificate) धारण करणाऱ्या उमेदवारांनी, राज्य शासन सेवेमध्ये ज्या ज्या ठिकाणी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण अशी अर्हता विहित केली असेल त्या त्या ठिकाणी शासन सेवेसाठी शालांत परीक्षा समकक्ष पात्रता आपोआप धारण केली आहे असे समजण्यात यावे.''

३. त्यानुसार, सर्व नियुक्ती प्राधिकारी यांनी कार्यवाही करावी. हे आदेश या आदेशाच्या दिनांकापासून तात्काळ अंमलात येतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०११०५२०१३५११०४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(बा. वि. निकम)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

परिशिष्ट ६ : एका पेक्षा अधिक शिक्षणक्रमांना प्रवेश

**DISTANCE EDUCATION COUNCIL**
**INDIRA GANDHI NATIONAL OPEN UNIVERSITY**

15983-16229

F.No.DEC/Notification/40.5.1.5/2012
Dated:01.11.2012

**NOTIFICATION**

**Sub: Policy on pursuing two or more programmes simultaneously in various combinations - regarding.**

The Distance Education Council in its $40^{th}$ meeting held on 08.06.2012 has decided on the policy on pursuing two or more programmes simultaneously in various combinations. Two degree programmes cannot be allowed to be pursued simultaneously. However, a student can pursue two programmes simultaneously through distance or combination of distance and regular modes from the same or different University(ies)/ Institution(s) in various combinations, *viz.,*

1. One Degree and one Diploma/Post Graduate Diploma/Certificate
2. One Post Graduate Diploma and one Diploma/Certificate
3. One Diploma and one Certificate
4. Two Post Graduate Diplomas
5. Two Diplomas
6. Two Certificates

This is for information and adherence by all concerned.

**(DIRECTOR)**

**To**

**VCs of all SOUs/ Heads of DEIs**

3. **The Registrar**
**YCMOU**
**Dnynagangotri, Near Gangapur Dam**
**Nashik-422 222,**
**MAHARASHTRA**

## Appendix - 7 : G.R. of Equivalency and Approval of State Govt. of Maharashtra for Degree's and Diploma's of Open Universities

## मुक्त विद्यापीठाच्या पदव्यांना समकक्षता व शासनमान्यता

**(१) अन्य विद्यापीठांच्या पदवीशी समकक्षता**

मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य यांच्या पत्र क्र. समक (उ. शि.)/१०९४/३२८६१/मवि-१, दि. ३० ऑक्टोबर १९९५ च्या पत्रान्वये 'केंद्रीय किंवा राज्य विधिमंडळाने अधिनियमाद्वारे भारतातील विद्यापीठाने दिलेली पदवी/पदविका आणि संसदेने अधिनियमाद्वारे इतर शैक्षणिक संस्था प्रस्तावित केलेल्या आहेत किंवा विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम (१९५६) मधील कलम क्र. ३ अन्वये मानीव विद्यापीठे घोषित केली आहेत अशांच्या बाबतीत पदवी किंवा पदविका मान्यता देण्याबाबतचे औपचारिक आदेश विद्यापीठाने काढण्याची आवश्यकता नाही'.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ हे महाराष्ट्र राज्याच्या विधिमंडळाने अधिनियमाद्वारे (कायदा क्र. २०/१९८९) स्थापन केलेले विद्यापीठ असून त्यास विद्यापीठ अनुदान आयोगाचीही मान्यता आहे. **त्यामुळे या विद्यापीठाची पदवी इतर विद्यापीठांच्या पदवीशी समकक्ष आहे.**

**(२) विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता**

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी त्यांचे पत्र क्र. F/S-15/89 (CPP-I) दि. ८ डिसेंबर १९९२ नुसार विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १९५६ च्या कायद्यातील कलम १२-बी अन्वये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास मान्यता दिली आहे.

**(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता**

उपसचिव व परीक्षा नियंत्रक, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांच्या पत्र क्र. १४७७ (१७/१९९४/कक्ष) **दि. १७ फेब्रुवारी १९९४ च्या पत्रातील मान्यतेसंबंधीचा मजकूर - 'यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ हे संविधिमान्य (Statutory) असल्यामुळे आपल्या विद्यापीठाच्या पदवीधर विद्यार्थ्यांकडून आलेले अर्ज देखील इतर मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवीधर उमेदवारांकडून आलेल्या अर्जांप्रमाणेच आयोगाकडून विचारात घेतले जातील'**

## मुक्त विद्यापीठाच्या पदवी/पदविकांना महाराष्ट्र शासन मान्यता

विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिलेली विद्यापीठे

राज्य सेवेतील पदासांठी पदवी/पदविकास मान्यता

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग

**शासन निर्णय** : क्रमांक आरजीडी-१३९४/प्र.क्र. २१/९४/१३,मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक ८ मार्च १९९५

**वाचा** : (१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक आरजीडी-१०६१/१८९६७/११४ - जे दिनांक २१ ऑगस्ट १९६९

**शासन निर्णय** : महाराष्ट्र लोक सेवा आयोगाशी विचार विनिमय करून उपरोक्त दिनांक २१ ऑगस्ट १९६९ च्या आदेशाद्वारे असा निर्णय घेण्यात आला होता की, केंद्र अथवा राज्य विधिमंडळाच्या अधिनियमाद्वारे स्थापित झालेली विद्यापीठे, संसदेच्या अधिनियमाद्वारे स्थापन झालेल्या इतर शैक्षणिक संस्था, किंवा विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम, १९५६ च्या अंतर्गत भाग ३ अन्वये जाहीर झालेली मानवी विद्यापीठे यांनी प्रदान केलेल्या पदव्या / पदविका तसेच भारतीय वैद्यकीय मंडळ अधिनियम, १९५६ च्या परिशिष्टांमध्ये अंतर्भूत केलेल्या वैद्यकीय व संलग्न विषयामधील पदव्या यांना शासकीय महाविद्यालयातील अध्यापकीय पदे वगळता, **राज्यातील सेवा व पदांवरील भरतीसाठी आपोआप मान्यता प्राप्त झाली असल्याचे समजण्यात यावे.**

(२) सदर आदेशासोबत विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिलेल्या वैधानिक विद्यापीठे व संस्थांची यादी जोडण्यात आली होती. आयोग मान्यताप्राप्त विद्यापीठे व संस्था यांची अद्ययावत यादी आता या आदेशासोबत जोडण्यात आली आहे. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरजीडी - १०६१/१८९६७/९१४/जे दिनांक २१ ऑगस्ट १९६९ मध्ये नमूद केलेल्या आणि वर परिच्छद १ मध्ये उद्धृत केलेल्या हेतूसाठी सदर सर्व विद्यापीठे/संस्था यांनी प्रदान केलेल्या पदवी/पदविकांना आपोआप मान्यता देण्यात आल्याचे समजण्यात यावे.

महाराष्ट्रचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

दा. र. राणे
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

(१) राज्यपालांचे सचिव
(२) मुख्य मंत्र्यांचे सचिव
(३) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
(४) महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई
(५) महालेखापाल, महाराष्ट्र -२, मुंबई
(६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
(७) अभिदान व लेखा अधिकारी, मुंबई
(८) प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा), मुंबई
(९) प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
(१०) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
(११) सर्व मंत्रालयीन शिक्षण
(१२) मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
(१३) अवर सचिव, भारत सरकार, शिक्षण मंत्रालय, नवी दिल्ली
(१४) निवड नस्ती

**वाचा : महाराष्ट्र शासनाच्या उपरोक्त शासन निर्णय क्रमांक आर.जी.डी. १३९४/प्र.क्र.२१/९४/१३ मंत्रालय, मुंबई. दिनांक ८ मार्च १९९५ च्या सोबत जोडलेल्या यादीमध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांची अनुक्रमांक १४६ वर नोंद करण्यात आलेली आहे.**

**Appendix - 8** : Letter of Recognition form UGC

APPENDIX 1

## APPENDIX 1.1 : LETTER OF RECOGNITION FROM UGC

UNIVERSITY GRANTS COMMISSION
BAHADUR SHAH ZAFAR MARG
NEW DELHI-110002.

NO. F.5-15/89 (OPP-I)

December, 1992

The Secretary
Govt. of Maharashtra
*Higher and Technical*
Education and Employment Deptt.
*Mantralaya Annexe*
Bombay- 400032

Sub : Recognition of Yashwantrao Chavan Maharashtra Open University, *Nashik for Central assistance under Section 12-B of the UGC Act, 1956.*

Sir,

With reference to the correspondence resting with your letter No. MOU/ 63003 (241/92) UNI dated 11th November, 1992 on the above subject, I am to say that the University Grants Commission has agreed to declare the Yashwantrao Chavan Maharashtra Open University Nashik established under Maharashtra State Act No. XX of 1989, fit to receive Central assistance for all purposes including Institutional development in terms of the rules framed under Section 12-B of the UGC Act, 1956.

The receipt of the letter may please be acknowledged.

Yours faithfully,

Sd/xxx
(I J GUPTA)
JOINT SECRETARY

*Copy to: -*

1. The Vice – Chancellor, Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik-422005.
2. Secretary to the Govt. of India, Ministry of Human Resource Development (Deptt. of Education) New Delhi.
3. The Registrar, Indira Gandhi National Open University, Maidan Garhi, New Delhi- 110068.
4. The Secretary, Association of Indian Universities, 16, Kotla Marg, New Delhi- 110002.
5. *Desk Officer (Meeting) / S.O.FD-III/S.O.SU-II/S.S.O.-I, Stat, U.G.C. New Delhi.*
6. All Officers /Sections, UGC New Delhi.

Sd/-
(D. D. Mehta)
SECTION OFFICER

## परिशिष्ट ९ : विद्यार्थी सहायता आणि विद्यार्थी कल्याण योजना

### ■ विद्यार्थी सहायता

अल्प उत्पन्न गटातल्या हुशार विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी साहाय्य योजना विद्यापीठातर्फे राबविली जाते. त्यासाठी विद्यापीठाने १५ लाखांची तरतूद केली आहे. या योजनेखाली आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेल्या शिक्षणक्रमासाठी असलेल्या शुल्कात सवलत देण्यात येते. त्यासाठी विद्यापीठाने विहित नमुना विकसित केला असून योग्य पात्रताधारक विद्यार्थ्यांना प्रवेश शुल्कात सवलत देण्यात येते.

### ■ विद्यार्थी कल्याण योजना

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी दरवर्षी क्रीडा व युवक महोत्सवांचे आयोजन करण्यात येते. तसेच विद्यार्थ्यांमधील संशोधन प्रवृत्तीला प्रोत्साहन देण्यासाठी आविष्कार ही संशोधनात्मक स्पर्धाही घेण्यात येत असते.

### ■ क्रीडा महोत्सव

विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना खेळाचे मैदान मिळावे म्हणून विद्यापीठाने विभागीय व विद्यापीठ पातळीवर क्रीडा स्पर्धा सुरू केल्या आहेत. यातून खेळाडूंना राज्य व राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धेत भाग घेता येतो. मा. राज्यपालांच्या कार्यालयाकडून आयोजित केल्या जाणाऱ्या आंतरविद्यापीठीय अश्वमेध व ए. आय. यू. च्या क्रीडास्पर्धेतही खेळाडूंना भाग घेता येतो.

### ■ युवक महोत्सव

विद्यापीठाच्या कलावंत विद्यार्थ्यांना त्यांच्या कलागुणांचे प्रदर्शन करता यावे म्हणून विद्यापीठाने विभागीय व केंद्रीय स्तरावर युवक महोत्सव सुरू केला आहे. यात वक्तृत्व स्पर्धा, एकांकिका, नृत्य संगीत, गायन यांसारख्या स्पर्धा घेण्यात येतात. मा. राज्यपालांच्या कार्यालयाकडून आयोजित केल्या जाणाऱ्या इंद्रधनुष्य व ए.आय.यू. (भारतीय विद्यापीठ संघ) यांच्यातर्फे घेण्यात येणाऱ्या राष्ट्रीय युवक महोत्सवात कलावंत विद्यार्थ्यांना सहभाग घेता येतो.

### ■ आविष्कार

विद्यापीठ स्तरावरील विद्यार्थ्यांमधील संशोधन प्रवृत्तीला प्रोत्साहन देण्यासाठी मा. राज्यपाल यांच्या कार्यालयातर्फे दरवर्षी आविष्कार ही संशोधनात्मक स्पर्धा घेण्यात येते. या आंतरविद्यापीठीय संशोधन महोत्सवातही मुक्त विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना भाग घेता येतो.

### ■ संवाद पत्रिका

राज्यभर पसरलेल्या मुक्त विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांशी संपर्क साधण्यासाठी मुक्त विद्यापीठ संवादपत्रिका हे मासिक प्रकाशित केले जाते. विद्यार्थ्यांना उपयुक्त माहिती लेख, सूचना यांचा यात समावेश असतो. अध्ययनार्थ्यांमधील अभ्यासाची प्रेरणा व दूरशिक्षणाबाबत जागरूकता वाढविण्याचे कार्य ही पत्रिका करत असते. सदर संवाद पत्रिका वेबसाईटवर वाचण्यासाठी उपलब्ध असेल.

### ■ आभासी वर्ग

विद्यार्थ्यांना उपग्रहाच्या माध्यमातून शिक्षण घेणे शक्य व्हावे म्हणून विद्यापीठाने अहमदाबाद येथील भारत सरकारच्या भारतीय अंतरिक्ष अनुसंधान संघटन (इस्रो) या संस्थेच्या मदतीने एज्युसॅट या उपग्रह वाहिनीद्वारा (सॅटेलाईट चॅनल) दूरशिक्षणाचा प्रकल्प सुरू केला आहे. या प्रकल्पांतर्गत राज्यात एकूण ४० व्हर्च्युअल लर्निंग सेंटर कार्यान्वित केलेली आहेत. याद्वारे थेट संपर्कसत्रे घेण्यात येतात.

### ■ राष्ट्रीय सेवा योजना

पारंपरिक विद्यापीठांप्रमाणेच मुक्त विद्यापीठाच्या १५०० विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय सेवा योजना सुरू करण्यात आली आहे.

### खालील संवर्गातील विद्यार्थ्यांना शुल्कात सवलत दिली जाते.

(१) अंध, अपंग, मूक-बधिर, कर्णबधिर विद्यार्थी (पाहा परिशिष्ट ३)

(२) विद्यापीठातील नियमित वेतनश्रेणीत कार्यरत सेवक व त्यांचे परिवारजन (स्वतः, पत्नी/पती, दोन पेक्षा अधिक नाही इतके अवलंबून असलेले अपत्य)

(३) मागासवर्गीय (शासनाच्या नियमाच्या अधीन) विद्यार्थी.

वरील संवर्गातील उमेदवारांनी संपूर्ण शिक्षणक्रम शुल्क भरून प्रवेश घ्यावा. त्यानंतर विद्यापीठ / शासनाच्या नियमाप्रमाणे शुल्क सवलतीची प्रक्रिया पूर्ण करावी. विद्यापीठ / शासनाच्या नियमाप्रमाणे शुल्काचा परतावा संबंधितांना देण्यात येईल.